# वंचित मुलांनी साजरी केली दिवाळी

**पुणे :** कर्वेनगरमधील सहजानंद सोसायटीच्या आसपास राहणाऱ्या वस्तीतील गरीब, वंचित मुलांबरोबर हिंदू महिला सभेच्या सदस्यांनी दिवाळी साजरी केली. आस फाउंडेशनच्या अनघा ठोंबरे यांच्या पुढाकाराने सदर कार्यक्रम पार पडला. या वेळी सर्व मुलांना दिवाळीच्या फराळाच्या पदार्थांबरोबर जीवनावश्यक वस्तू व खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी हिंदू महिला सभेच्या सुप्रिया दामले, स्मिता नातू, मृणाल गोडबोले, नीला मोघे, प्राची सप्रे व सुधा लेले या सदस्या सहभागी झाल्या होत्या. याशिवाय, नुकतेच नवरात्रीमध्ये समाजातील भिक्षेकरी, वंचित, उपेक्षित समाजातील मुलींसाठी रेणूताई गावस्कर यांच्या पुढाकाराने चालविण्यात येत असलेल्या घरटं निवासी प्रकल्पातील मुलींचे कुमारिकापूजन करीत त्यांना मदत देखील करण्यात आली.